महाराष्ट्र शासन

<u>अतितात्काळ</u>

क्रमांकः- संकीर्ण-२००८/यादी /प्र.क्र. ५५३/मावक-५
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.**
फोन नं. २२०२९५२६ फॅक्स २२८३६६८८
दिनांक :- १५ एप्रिल, २०१०.

**प्रति,**
सर्व विभागीय आयुक्त (महसूल),
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व उपजिल्हाधिकारी,
सर्व उपविभागीय अधिकारी,
सर्व अध्यक्ष, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती ,
सर्व सदस्य सचिव तथा संशोधन अधिकारी, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती ,

**विषय :- <u>महाराष्ट्र राज्याची अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाची यादी -- सुधारणा</u>**
**संदर्भ :- समक्रमांकीत दिनांक २६ सप्टेंबर, २००८ चे पत्र**

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाची दिनांक २६ सप्टेंबर , २००८ रोजी यादी अद्ययावत करण्यात आली असून ती जाती प्रमाणपत्र देणा-या व त्याची पडताळणी करणा-या सक्षम प्राधिका-यांना तसेच मागासवर्गीयाचे लाभ लागू करताना सदरहू यादीचा उपयोग व्हावा याकरीता सुलभ संदर्भासाठी जाती जमातींचे एकत्रित संकलन स्वरुपात यादी असून ती यादी शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर ठेवण्यात आली आहे. सदर अनुसूचित जातीच्या यादीमध्ये केंद्र शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारणेस अनुसरुन राज्याच्या उपरोक्त अनुसूचित जातीच्या यादीतील अ.क्र. ८, ११, १२, व २५ यामध्ये सुधारणा करण्यात आली असून ती खालील प्रमाणे आहे :-

| अ.क्र | जातीच्या यादीतील अनुक्रमांक | केंद्र शासनाच्या यादीत असलेल्या तथापि महाराष्ट्राच्या यादीत नसलेल्या जातींची नोंद | राज्याच्या यादीतील पुर्वीची नोंद | राज्याच्या यादीतील सुधारीत नोंद |
|---|---|---|---|---|
| १ | ८ | बसोड | बसोर, बुरुड, बांसोर, बांसोडी | बसोर, बुरुड, बांसोर, बांसोडी, **बसोड** |
| २ | ११ | समगारा, चर्मकार , परदेशी चामार | भांबी, भांभी, असादरु, असोदी, चामडिया, चमार, चमारी, चांभार, चमगार, हरळय्या, हराळी, खालपा, माचीगार, मोचीगार, मादर, मादिग, मोची, तेलगू मोची, कामाटी मोची, राणीगार, रोहिदास, नोना, रामनामी, रोहित, समगार, सतनामी, सूरज्यबंशी, सूरज्यरामनामी | भांबी, भांभी, असादरु, असोदी, चामडिया, चमार, चमारी, चांभार, चमगार, हरळय्या, हराळी, खालपा, माचीगार, मोचीगार, मादर, मादिग, मोची, तेलगू मोची, कामाटी मोची, राणीगार, रोहिदास, नोना, रामनामी, रोहित, समगार, सतनामी, सूरज्यबंशी, सूरज्यरामनामी , **समगारा, चर्मकार , परदेशी चामार** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | १२ | कोरार<br>झाडमल्ली<br>हेला | भंगी, मेहतर, ओलगाना, रुखी, मलकाना, हलालखोर, लालबेगी, बाल्मिकी, करोर, झाडगल्ली | भंगी, मेहतर, ओलगाना, रुखी, मलकाना, हलालखोर, लालबेगी, बाल्मिकी, **कोरार, झाडमल्ली, हेला** |
| ४ | २५ | हलसवार | हलसार, हसलार, हुलसवार, हुलसवार | हलसार, हसलार, हुलसवार, **हलसवार** |

२. जातीचे दाव्याची तपासणी करताना सर्व संबंधीत प्राधिका-यांनी अनुसूचित जातीच्या यादीमध्ये करण्यात आलेल्या उपरोक्त सुधारणांची नोंद घेऊन त्या प्रमाणे उचित ती कार्यवाही करावी.

३. ज्या अर्जदारास " **करोर** " , " **झाडगल्ली** " या नावाने जातीची प्रमाणपत्रे , जात वैधता प्रमाणपत्रे यापुर्वी पारीत करण्यात आलेली असल्यास, अशा अर्जदाराची जातीची नोंद उपरोक्त सुधारीत नोंदी प्रमाणे अनुक्रमे " **कोरार** " , " **झाडमल्ली** " अशी समजण्यात यावी.

३. सदरची अनुसूचित जातीच्या यादीतील सुधारणा महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर टाकण्यात आली असून त्याचा संकेताक क्रमांक- **२०१००४१५१५३३१९००१** असा आहे. सदर यादी सर्व जनतेसाठी खुली असून सदरहू वेबसाईट वरुन तीचे अवलोकन करावे वा प्रत प्राप्त करुन घ्यावी.

**( सतीश गवई )**
प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२ यांना विनंती की, उपरोक्त झालेल्या सुधारणाची माहिती त्यांनी त्यांच्या अखत्यारीतील सर्व आस्थापनांना करावी.

२) संचालक, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३) उपव्यवस्थापक (जनगणना कार्य) , गृह मंत्रालय निदेशालय , जनगणना कार्यालय महाराष्ट्र ,एक्सचेंज बिल्डींग दुसरा मजला , सर शिवसागर रामगुलाम मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई- ४०० ००१. यांना त्यांचे पत्र दिनांक २५/०२/२०१० च्या सदंर्भात माहितीकरीता व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीकरीता अग्रेषित.